# प्रेसनोट दि. १८/०१/२०२१

## “डिव्होर्सी मॅट्रिमोनी साईटवरून ओळख झालेल्या घटस्फोटीत महिलेस पत्रकार असल्याची बतावणी करुन तिचे व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन खंडणी मागणा-यास सायबर सेलने घेतले ताब्यात. ”

याबाबत अधिक माहिती की, आरोपी नामे राजीव पटेल ऊर्फ राजीव परमार याने **डिव्होर्सी मॅट्रिमोनीअल** साईटवरून फिर्यादी महिलेशी स्वतः घटस्फोटीत असल्याचे सांगून ओळख वाढवली. फोनवरील संपर्क, मेसेजस आणि प्रत्यक्ष भेटीनंतर दोघांनी **लीव्ह इन** मध्ये राहण्याचा निर्णय घेतला. लीव्ह इन मध्ये राहत असताना आरोपी याने शारिरीक संबंधाचे मोबाईलमध्ये चित्रीकरण केले. काही दिवसांत आरोपी यांने फिर्यादी महिलेकडे वैयक्तीक अडचणीकरीता पैशांची मागणी केली. त्याची पैसे मागण्याची पद्धत आणि वारंवार मागणी करण्यामुळे फिर्यादी यांनी त्यांचेपासून लांब राहण्याचे ठरविले.

त्यानंतर आरोपीने फिर्यादी महिलेस एका अनोळखी मोबाईल क्रमांकावरून त्यांचे शारिरीक संबंधाचे व्हिडीओ व्हाट्सअपद्वारे पाठवून तो पत्रकार असल्याचे बतावणी केली आणि त्या व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन तसे न करण्याकरीता ६ लाख रु. ची खंडणी मागितली. त्यामुळे संबंधित फिर्यादीने वाकड पो. स्टे. येथे फिर्याद दिलेवरून तेथे दि. १४/०१/२०२१ रोजी गु.र.नं.५६/२०२१ भा.द.वी. कलम ३८५, सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(ई), ६७ (ए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयात तांत्रिक मदत तसेच आरोपीचा शोध घेणेकरीता पत्र प्राप्त झाले. त्याअनुशंगाने सायबर सेलचे सपोनि. सागर पानमंद व पथकाने यात तांत्रिक विश्लेषण व फिर्यादी यांचेकडून प्राप्त माहितीच्या आधारे निष्पण्ण केले आरोपीचे मुळ नाव राजीव पटेल ऊर्फ राजीव परमार नसुन **अहमद याकुब लखानी** असे असून तो कोंढवा येथील रहिवासी आहे. सदरबाबत सायबर सेलच्या पथकाने समांतर तपास करुन त्यास दि.१६/०१/२०२१ रोजी कोंढवा येथून ताब्यात घेऊन पुढील कार्यवाहीकामी वाकड पो.स्टे. च्या ताब्यात दिले आहे.

सदर गुन्हयाचा तपास वाकड पो. स्टे. चे संतोष पाटील, पोलीस निरीक्षक(गुन्हे) हे करीत असून सदर आरोपीने आणखी काही महिलांना फसविले आहे का याबाबत तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त मा.श्री.कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त मा.श्री. रामनाथ पोकळे सो, पोलीस उप आयुक्त मा.श्री. सुधीर हिरेमठ सो, सहा. पोलीस आयुक्त प्रेरणा कट्टे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय तुंगार, सायबर सेल यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पो.नि. सागर पानमंद, पोलीस अंमलदार अतुल लोखंडे, भास्कर भारती, नितेश बिचेवार यांचे पथकाने केली आहे.